# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी : २५६०११११०
तारेचा पत्ता : 'युनिपुना'
फॅक्स : ०२०.२५६९३८९९

गणेशखिंड,
पुणे ४११००७.


संदर्भ : शै.प्रवेश/ ४३९६

दि.: २८-६-२०११

प्रति,

१. मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये.

२. मा. विभागप्रमुख ,
पुणे विद्यापीठ, पुणे ७.

**विषय : क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले शिष्यवृत्तीसाठी अर्ज पाठविण्याबाबत...**

महोदय/महोदया,

आपणास कळविण्यात येते की, पुणे विद्यापीठाने सन २००७ पासून क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले शिष्यवृत्ती योजना सुरू केलेली आहे. सदर योजनेसाठी अर्थसंकल्पात रू. २ कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरून शैक्षणिक वर्ष सन २०११ — २०१२ करिता आपल्या महाविद्यालयातील **पदवी अभ्यासक्रमासाठी १० व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ०५** विद्यार्थिनींच्या नावाची शिफारस करण्यात यावी.

पुणे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unipune.ac.in) विहित नमुन्याचा तक्ता उपलब्ध असून सदर तक्त्यात माहिती भरून पाठविण्यात यावी.

सोबत सदर शिष्यवृत्तीचे नियम जोडलेले आहेत. त्याप्रमाणे संकेतस्थळावर उपलब्ध असलेला अर्ज भरून पाठवावा. अर्जासोबत सन २०११ — २०१२ चा तहसीलदाराच्या सहीचा उत्पन्नाचा दाखला, गुणपत्रिका, जातीचा दाखला, देवदासी, वारांगणा, एड्सग्रस्त असल्याची कागद पत्रे साक्षांकित करून पाठविण्यात यावीत.

**रू. १,५०,०००/— पर्यंत** उत्पन्न व **५०%** पुढे मार्कस असलेल्या विद्यार्थिनींनाच सदर योजनेचा लाभ देण्यात येईल.

**ज्या विद्यार्थिनींना भारतसरकार शिष्यवृत्ती, आर्थिक दुर्बल घटकातील शिष्यवृत्ती इ. कोणतीही शिष्यवृत्ती मिळत नाही अशा विद्यार्थिनींचाच विचार करण्यात येईल.**

आपणास विनंती करण्यात येते की, आपण सदर पत्रातील आशय लक्षात घेऊन व नियमांचे काटेकोर पालन करून विद्यार्थिनींच्या नावाची शिफारस करावी.

अपूर्ण व चुकीची नावे असलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही व त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. तसेच समितीचा निर्णय अंतिम असल्याने शिष्यवृत्ती नाकारण्याची कारणे कोणत्याही महाविद्यालयास कळविली जाणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी.

अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत दि. **१ सप्टेंबर, २०११** आहे. सदर शिष्यवृत्तीचे अर्ज पुणे विद्यापीठात **समक्ष** सादर करावेत. अपूर्ण व **मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.**

कळावे,

आपला विश्वासू,
२८/६/११
उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

# क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले शिष्यवृत्ती

१. आर्थिक वर्ष २०११–२०१२ मध्ये वार्षिक उत्पन्न रू. १,५०,०००/– असणाऱ्या व ५० टक्केच्या पुढे मार्क्स असणाऱ्या विद्यार्थिनींचे अर्ज स्विकारावेत.
२. उत्पन्नाचा दाखला तहसिलदाराच्या सहीचा ग्राहय धरण्यात येईल.
३. प्रत्येक महाविद्यालयाकडून फक्त पदवीचे १० आणि पदव्युत्तरचे ०५ अर्ज स्विकारण्यात येतील.
४. सदर शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थिनीच्या शैक्षणिक कालखंडात विद्यार्थिनींला एकदाच मिळेल.
५. अर्ज स्वीकारण्याची अंतीम मुदत **१ सप्टेंबर, २०११** अशी राहील. सदर शिष्यवृत्तीचे अर्ज पुणे विद्यापीठात समक्ष सादर करावेत. अपूर्ण व मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.
६. ज्या विद्यार्थिनींना भारत सरकार शिष्यवृत्ती/आर्थिक दुर्बल घटकातील शिष्यवृत्ती इ. कोणत्याही शिष्यवृत्तीचे लाभ मिळत नाहीत. अशाच विद्यार्थिनींच्या अर्जाचा प्राधान्याने विचार केला जाईल.
७. ग्रामीण पार्श्वभूमी, शैक्षणिक गुणवत्ता, घटस्फोटित, विधवा, आर्थिक दुर्बल, सामाजिक मागासलेपणा अशा विद्यार्थिनींचा तसेच देवदासी, वारांगणा, एड्सग्रस्त मातांच्या मुलींचा प्रकर्षाने विचार केला जाईल.
८. ७० टक्के पदवीपूर्व विद्यार्थिनी (घटस्फोटित, विधवा विद्यार्थिनी तसेच देवदासी, वारांगणा, एड्सग्रस्त मातांच्या मुलींना प्राधान्य.) ३० टक्के पदवीपूर्व विद्यार्थिनी (घटस्फोटित, विधवा विद्यार्थिनी तसेच देवदासी, वारांगणा, एड्सग्रस्त मातांच्या मुलींना प्राधान्य.)
९. विद्यार्थीनींनी राष्ट्रीयकृत बॅकेत खाते उघडणे बंधनकारक असून बॅकेचे नाव व पत्ता, बॅक खाते क्रमांक, एम.आय.सी.आर. कोड, आणि आय.एफ.एस. कोड ची नोंद अर्जावर करावी.

**(टिप : या सर्व नियमांचे** पालन **प्राचार्यांनी काटेकोरपणे करावे. याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांवर राहील. )**

# क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले शिष्यवृत्ती साठी करावयाचा अर्ज.

फोटो

**अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत दि. १ सप्टेंबर, २०११**

(१) महाविद्यालयाचे नाव व पत्ता : ______________________

(२) विद्यार्थिनीचे संपूर्ण नाव : ______________________

(३) वडिलांचे/ पालकांचे संपूर्ण नाव : ______________________

(४) आईचे संपूर्ण नाव : ______________________

(५) कायमचा पत्ता : ______________________

(६) सध्याचा पत्ता : ______________________

(७) अर्जदाराची जन्मतारीख व वय : ______________________

(८) विवाहित असल्यास पतीचे नाव : ______________________

(९) प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाचे नाव : ______________________

(१०) मागील वर्षी मिळालेल्या गुणांची टक्केवारी (गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत जोडावी) : ______________________

(११) पालकाचे वार्षिक उत्पन्न : ______________________
(उत्पन्नाच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत जोडावी)

(१२) बॅंकेचे नाव व पत्ता : ______________________

(१३) खाते क्रमांक : ______________________

(१४) एम.आय.सी.आर. कोड : ______________________

(१५) आय.एफ.एस. कोड : ______________________

अर्जदाराची सही

प्राचार्यांची शिफारस आणि
सही व शिक्का

## क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थिनींच्या नावाचा तक्ता.

(२०११—१२)

| अ. क्र. | विद्यार्थिनीचे नाव | पदवीपूर्व/ पदव्युत्तर | गुण/ टक्के | वार्षिक उत्पन्न | बॅंकेचे नाव व पत्ता | खाते क्रमांक | एम.आय. सी.आर कोड | आय.एफ. एस. कोड | कौटुंबिक व सामाजिक परिस्थितीविषयी प्राचार्यांची शिफारस. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |